# कास्ट्राईब शिक्षक संघटना बैठकीचे इतिवृत्त दि. १७/०४/२०१८

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | दि. ३ मार्च २०१८ च्या शासन परिपत्रकनुसार बैठकांचे आयोजन करावे. | शिक्षण उपसंचालक/शिक्षणाधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ३ मार्च २०१८ च्या शासन परिपत्रकनुसार कार्यवाही करावी. | शिक्षण उपसंचालक/ शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |
| २ | मागासवर्गीयांचा भरतीमधील अनुशेष दूर करणे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्णयानुसार २ मे २०१२ नंतर नेमणूका केलेल्या शिक्षण सेवकांना मान्यता देणे (शासन निर्णय दि.४.४.२०१८ प्रमाणे कार्यवाही करणे.) | सर्व शिक्षणाधिकारी यांनी त्यांचेकडे प्राप्त होणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्तीसाठीच्या प्रस्तावांवर महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार कार्यवाही कारावी. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्णयानुसार २ मे २०१२ नंतर नेमणूका दिलेल्या शिक्षण सेवकांच्या प्रलंबित मान्यता प्रस्तावावर देखील शासन निर्णय दि. ०४.०४.२०१८ प्रमाणे आठ आठवडयांच्या आत निर्णय घेवून संबंधितांना कळवावे. यासाठी शिक्षणाधिकारी यांनी कॅम्प लावावेत. न्यायालयाच्या आदेशाचे अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी.<br>जर न्यायालयाचे आदेश हे शासनाचे प्रचलित धोरणांविरुध्द असेल तर ही बाब वरिष्ठ स्तरावर/शासन स्तरावर आणावी. शासन/संचालनालय अशा न्यायालयाच्या आदेशाबाबत पूर्नविर्लोकन याचिका दाखल करतील. याबाबत शासनाच्या दि. ०४.०१.२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |
| ३ | दि. २ मे २०१२ पूर्वी व त्यानंतर नियुक्ती केलल्या ज्युनिअर कॉलेज मधील शिक्षण सेवकांना तात्काळ मान्यता देणे. | शासन/वरिष्ठ कार्यालयाच्या आदेश व सूचना यानुसार शिक्षणाधिकारी यांनी मान्यता प्रकरणी आवश्यक कार्यवाही कारावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ४ | पदोन्नतीतील मागासवीर्गीयांचा अनुशेष पूर्ण करावा. उदा. संजय पांडूरंग सावंत, सहा. शिक्षक (SC), सौ.ताराबाई माधवराव मोहिते विद्यालय रेठरे बु. ता.कराड, जि. सातारा. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. सातारा यांनी सुनावणी घेवून निर्णय घ्यावा. तसेच प्रभारी मुख्याध्यापक नेमणेबाबत शासन निर्णय दि. १८.१०.१९९७ नुसार कार्यवाही कारावी. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. सातारा स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | दि. १४ नोव्हेंबर २०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे शिक्षकांची सेवाज्येष्ठता यादी करणे. | शिक्षणाधिकारी यांनी सेवाज्येष्ठता यादीबाबत दि. १४ नोव्हेंबर २०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ६ | अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनामध्ये मागासवर्गीय प्रवर्गातील शिक्षकांवर अन्याय होत आहे. उदा. विकास तांबे, सहा. शिक्षक (प्रवर्ग SC), श्री. आर.पी.बागवे हायस्कूल मसुरे, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. सिंधुदुर्ग यांनी समायोजन झालेल्या शिक्षकाला जर शाळा रुजू करुन घेत नसेल तर त्या शिक्षकाचे पगार मूळ शाळेतच काढण्याच्या सूचना संबंधित मुख्याध्यापकांना द्याव्यात तसेच रुजू करुन न घेणाऱ्या शाळेचे पद व्यपगत करण्याबाबचा प्रस्ताव संचालनालयास सादर करावा. | शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.सिंधुदुर्ग | तात्काळ |
| ७ | समायोजन न झालेल्या शिक्षकांचे ऑफ लाईन समायोजन तात्काळ व्हावे. ऑफ लाईन समायोजनाचा प्रस्ताव संबंधित शिक्षणाधिकारी यांनी शासनास सादर करावा. | अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन फक्त ऑनलाईन पध्दतीनेच करावेत ऑफलाईन पध्दतीने करु नयेत अशा मा.आयुक्त शिक्षण कार्यालयाच्या सूचना आहेत. | -- | -- |
| ८ | अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन न करणाऱ्या शाळांवर कारवाईचा प्रस्ताव शासनास सादर करणे. | ज्या शाळा अतिरिक्त कर्मचाऱ्यांना रुजू करुन घेत नाहीत अशा शाळांची पदे व्यपगत करण्याच्या सूचना संचालनायाकडून प्राप्त झालेल्या आहेत. अशा शाळांची पदे व्यपगत करण्याच्या प्रस्ताव देखील संचालनालयास पाठविण्यात आलेले आहेत. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| १० | मा. उच्च न्यायालय, मुंबई निर्णयानुसार श्री. बाबासो गणपती आवटे याना निवृत्तीवेतन मिळावे. | शिक्षणाधिकरी यांनी न्यायालयीन आदेशाप्रमाणे कार्यवाही कारावी. अवमान याचिका दाखल होणार नाही याची दक्षता घ्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ११ | शिक्षकांचे वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणीचे प्रस्ताव तत्काळ मंजूर करणे. | शिक्षणाधिकारी यांनी वरिष्ठ/निवडश्रेणीस पात्र असणाऱ्या व प्रशिक्षण पूर्ण न केलेल्या शिक्षकांकडून लगतचे प्रशिक्षण पूर्ण करण्याच्या अटीवर हमीपत्र घेवून वरिष्ठ/निवडश्रेणीस सुनावणी घेवून मान्यता द्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर